SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 Email – affiliationt1@unishivaji.ac.in
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९३२९४ व २६९२३३३.
Estd: 1962
A++ Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/माने/ २४५५ दिनांक 28 JAN 2022

प्रति,

**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, शारीरिक शिक्षण,**
**शिक्षणशास्त्र, विधि, महाविद्यालये.**

विषय:- विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयीन शिक्षकांच्या ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार सहाय्यक प्राध्यापक पद (एजीपी ७००० व ८०००) (Academic level १० ते ११) व (Academic level ११ ते १२) च्या स्थाननिश्चितीबाबत.

संदर्भ :- १)एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/माने/२३८६ दि.३० डिसेंबर २०२१
२)उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रं.२०२१/प्र.क्रं.०६/विशि-३ दि.७ जाने. २०२२
३)जा.क्रं. आस्थापना/६६ दि.०७.०१.२०२२

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भ क्रं. १ च्या पत्रान्वये महाविद्यालयीन शिक्षकांची ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार सहाय्यक प्राध्यापक पद (एजीपी ७००० व ८०००), (Academic level १० ते ११) व (Academic level ११ ते १२) साठी दि.११.०१.२०२२ ते दि.२५.०१.२०२२ अखेर स्थाननिश्चिती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था मधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेणेबाबत तसेच विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या दैनंदिन उपस्थिती बाबत महाराष्ट्र शासनाने तसेच विद्यापीठ कार्यालयाने उपरोक्त अनुक्रमे संदर्भ क्रं. २ व ३ नुसार कळविले आहे.

या कार्यालयाने उपरोक्त संदर्भ क्रं. १ नुसार कळविले प्रमाणे दि.११.०१.२०२२ ते दि.२५.०१.२०२२ अखेर स्थाननिश्चिती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता शासनाने कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना व अंमलबजावणी कडक केलेली आहे.

याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, कोरोना प्रतिबंधात्मक उपाय व अंमलबजावणी काटेकोर होण्याच्या दृष्टीकोनातून **स्थाननिश्चिती शिबिराचे वेळी उपस्थित राहणाऱ्या सर्व शिक्षक, प्राचार्य व संस्था प्रतिनिधी व विषय तज्ञ यांनी कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेले प्रमाणपत्र किंवा गेल्या चोवीस तासामधील RTPCR टेस्ट केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे** याची नोंद घ्यावी.

सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.
कळावे,

**आपला विश्वासू**

**प्र.कुलसचिव**